# परिपत्रक

सर्व अधिविभाग व विभागांना पुनःश्च कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे लेखासंहितेमधील **नियम क्र. 1.8** मध्ये नमूद केलेली तरतूद खालीलप्रमाणेः

> Every Budget Controlling Officer is required to undertake reconciliation of receipts and expenditure at the end of every two months with the Cash-book Unit of the Finance Department. On agreement, the reconciliation statement shall be signed by Budget Controlling Officer as well as the officer designated for this purpose in the Finance Department.

प्रत्येक विभाग व अधिविभागप्रमुख/वित्तीय नियंत्रण अधिकारी यांनी जमा व खर्चाचा ताळमेळ **प्रत्येक व्दिमाहिस** कॅशबुक मधील नोंदीशी करून, ताळमेळ झाल्यावर ताळमेळ तक्त्यावर विभाग व अधिविभागप्रमुख/वित्तीय नियंत्रण अधिकारी व वित्त व लेखा शाखेचे सहाय्यक कुलसचिव/मुख्यलेखापाल यांची स्वाक्षरी घेण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात येवूनही विभाग/अधिविभाग यांचेकडून त्यांचेकडील जमा/खर्च नोंदीचे ताळमेळ **प्रत्येक व्दिमाहिस** या विभागातील नोंदीशी घेतले जात नाही असे दिसून आले आहे.

तेंव्हा सदर बाबत आपणास कळविण्यात येते की, सन **2018–2019** या आर्थिक वर्षातील आपल्या विभागाकडील सर्व शिर्षकांचे (Reconciliation) ताळमेळ या विभागातील नोंदीसोबत करून घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

सदरचे ताळमेळाचे (Reconciliation) काम सर्व संबंधितांनी अग्रक्रमाने करण्याचे आहे. अन्यथा यातुन उद्‌भवणाऱ्या चुका इत्यादीस लेखा/कॅशबुक विभाग जबाबदार राहणार नाही. ताळमेळ घेतेवेळी आढळून येणाऱ्या त्रुटी दुरूस्त करण्यासाठी जमेच्या बाबतीत लेखा विभागातील जमा स्विकृती विभागाकडून व खर्चाच्याबाबतीत संबंधित बिल्स् विभागाकडून दुरूस्ती व्हौचर करून घेण्याची कार्यवाही सत्वर करून त्याचा अहवाल संबंधित अधिविभागप्रमुख व विभागप्रमुखांच्या स्वाक्षरींसह, पूर्वी कळविल्याप्रमाणे योग्य त्या नमुन्यात सादर करण्याचा आहे.

संबंधित विभागाकडे कोणताही जमाखर्चाचा व्यवहार नसलेस व्यवहार नसल्याबाबत अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

वित्त व लेखाअधिकारी

प्रती :– सर्व अधिविभाग व विभाग यांना